# नियमित दिवाणी दावा क्र. १११/२०१६.

**नि. ६३ क्रमशः**

**वादी तर्फे साक्षीदार क्र. १ रामदास एकनाथ माळी यांचा पुढील सरतपास वकिल आर. सी. जाधव यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

मी सदरील प्रकरणात पुराव्याकामी प्रतिज्ञालेख दाखल केला असून त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. तो **नि.क्र. ६३** लगत आहे. सदरील प्रकरणात नि. क्रं. ०३ सोबत गट क्रं. १८४४/१ चा ७/१२ उतारा प्रमाणीत प्रत दाखल केला. तो **नि. क्रं ७१** वर आहे. नि. क्रं. ३५ सोबत गट क्रं. १८४४ चा नकाशा प्रमाणीत प्रत दाखल केला आहे तो **निशाणी क्रं. ७२** वर आहे. नि. क्रं. २९ सोबत नियमीत दिवाणी अपिल क्रं. १४/२०१५ चा सुलेनामाची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे तो **निशाणी क्रं. ७३** वर आहे. फेरफार नोंद क्रमांक १०२१६ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे तो **निशाणी क्रं. ७४** वर आहे. नि. क्रं. ३७ सोबत मालमत्ता क्रमांक १८४४/१ ची पर आकारणी यादी चा प्रमाणीत प्रत दाखल केली आहे तो **निशाणी क्रं. ७५** वर आहे. नि. क्रं. ४६ व ६२ सोबत प्रतिवादी क्रं. १ व १ब चा मुत्यू दाखल्याची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे तो **निशाणी क्रं. ७६ व ७७** वर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. पी पी. पवार वकिल यांच्यामार्फत यांच्या तोंडी विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृती

Digitally signed by SUMIT SURESHCHANDRA CHHALLANI
Date: 2025.06.25 16:20:41 +0530

(एस. एस. छल्लाणी)

दि. २५/०६/२०२५.

दिवाणी न्यायाधिश क. स्तर,

**चांदवड.**